|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

## निवेदन

## ३३ वा दीक्षांत समारंभ

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातर्फे माहे डिसेंबर-२०२३ व एप्रिल/मे -२०२४ मध्ये व त्यापुर्वी घेण्यात आलेल्या परीक्षांमध्ये जे विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. तद्वतच ज्या विद्यार्थ्यांना विद्यावाचस्पती (Ph.D.) घोषीत झालेली आहे, अश्या सर्व विद्यार्थ्यांकडून पदवी/पदविका प्रमाणपत्रासाठी Online अर्ज मागविण्यात येत आहेत. तदनंतर प्रस्तुत विद्यार्थ्यांसाठी **"तेहतीसावा दीक्षांत समारंभ"** आयोजीत करण्यात येऊन त्यात पात्र विद्यार्थ्यांना पदवी/पदविका प्रदान करण्यात येईल.

३३ वा दीक्षांत समारंभात ज्या विद्यार्थ्यांना पदवी/पदविका प्रमाणपत्रे घ्यावयाची आहेत, अशा विद्यार्थ्यांनी त्यांचे पदवी/ पदविका प्रमाणपत्र मिळण्याकामी Online अर्ज भरावयाचे असून त्याची लिंक विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेत स्थळावर देण्यात आलेली आहे. विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या Home Page वरील Student Corner - Convocation - 33rd Convocation Ceremony या लिंक वर जाऊन आवश्यक ती माहिती भरावी.

**शै.वर्ष २०२३ -२४ च्या अंतिम वर्षात प्रवेशित अर्थात माहे एप्रिल/मे/ जून -२०२४** (परीक्षा अर्जासोबत पदवी प्रमाणपत्राचे शुल्क भरलेले विद्यार्थी वगळून) **तसेच यापूर्वीच्या परीक्षेत उत्तीर्ण व विद्यावाचस्पती (Ph.D.) धारक विद्यार्थ्यांसाठी पदवी/पदविका प्रमाणपत्रासाठी अर्ज करण्याचा विहित कालावधी**

| | |
|---|---|
| विनाविलंब शुल्कासह Online अर्ज भरण्याचा कालावधी | **दि. ०५ ऑगस्ट, २०२४ ते ३० सप्टेंबर, २०२४** |
| विलंब शुल्कासह Online अर्ज भरण्याचा कालावधी | **दि. ०१ ऑक्टोबर, २०२४ ते १५ ऑक्टोबर , २०२४** (विहीत शुल्क + ₹ १००/- विलंब शुल्क) |

| | **पदवी/पदविका अर्जासाठी लागणारे शुल्क** | |
|---|---|---|
| १. | **पदवी प्रमाणपत्र शुल्क (उत्तीर्ण वर्षापासून पाच वर्षाच्या आंत)** | **₹ ५००/-** |
| २. | **पदवी प्रमाणपत्र शुल्क** (उत्तीर्ण वर्षापासून पाच वर्षापेक्षा अधिक कालावधी) | **₹ १३००/-** |

विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्रासाठी लागणारे विहित शुल्क Credit Card /Debit Card / Net Banking/ UPI द्वारे Online Payment द्वारेच अदा करावे. तत्पूर्वी Online अर्ज भरतांना सोबत दिलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करावे. आपल्या अर्जात अपुर्णता अथवा त्रृटी आढळून आल्यास आपला अर्ज रद्द करण्यात येईल व विद्यार्थ्यांस कोणतेही शुल्क परत करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

३३ व्या दीक्षांत समारंभाबाबतची सर्व माहिती यथावकाश वर्तमानपत्रात तसेच विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेत स्थळावर वेळोवेळी जाहीर करण्यात येईल.

**संचालक**
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

जा.क्र. कबचौउमवि/पदवी/७ह/२७०९ /२०२४ दि.०५/०८/२०२४

- **प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :**

१) मा. प्राचार्य/ संचालक, विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये/ परिसंस्था यांना विनंती की, प्रस्तुत निवेदन / सूचना विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी सूचना फलकावर लावण्याची व्यवस्था करावी.
२) कबचौउमवि अंतर्गत सर्व विभाग प्रमुख (प्रशासकीय विभाग व शैक्षणीक प्रशाळा)
३) मा. जनसंपर्क अधिकारी, कबचौ उमवि, जळगाव - सदर निवेदन Print & Electronics Media मध्ये प्रसिध्दीसाठी

## पदवी प्रमाणपत्रासाठी ऑनलाईन अर्ज भरण्याकामी आवश्यक सुचना

१. शै.वर्ष २०२३-२४ मध्ये अंतिम वर्षात प्रवेशित Fresh विद्यार्थ्यांनी, अर्थात माहे एप्रिल/ मे - २०२४ मध्ये परीक्षेच्या वेळी ज्या विद्यार्थ्यांनी आपल्या परीक्षा अर्जासोबत पदवी प्रमाणपत्रासाठी आवश्यक शुल्क भरलेले आहे, अशा विद्यार्थ्यांनी पुन्हा **पदवी प्रमाणपत्र मिळण्याकामी अर्ज करू नये.** अशा विद्यार्थ्यांचे अर्ज बाद ठरविले जातील व त्यांनी भरलेले शुल्क परत केले जाणार नाही.

२. **जे विद्यार्थी माहे एप्रिल/ मे २०२४ मध्ये पुनर्परिक्षार्थी (Repeater) म्हणून बसले होते, अशा उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्रासाठी विहीत शुल्क भरणे आवश्यक आहे.**

३. ज्या विद्यार्थ्यांनी शै.वर्ष २०२२-२३ पूर्वी उत्तीर्ण होऊन पदवी प्रमाणपत्रांसाठी अर्जही केलेला होता. मात्र त्यापैकी **काहींनी त्यांचे पदवी प्रमाणपत्र अद्याप पर्यंत विद्यापीठातून नेलेले नाही, किंवा त्यांचे पदवी प्रमाणपत्र टपालाने परत आलेले आहेत,** अशा **अवितरीत प्रमाणपत्रांची यादी** उपरोक्त संकेत स्थळावरच Circular regarding Undelivered Degree Certificate या नावाने प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्यामुळे जुन्या विद्यार्थ्यांनी या **यादीत आपले नांव नाही, याची खात्री करूनच पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज करावा.** या यादीतील विद्यार्थ्यांचे पुन्हा आलेले अर्ज बाद करण्यात येतील व त्यांना भरलेले शुल्क ही परत केले जाणार नाही.

४. काही विद्यार्थ्यांना यापूर्वी विद्यापीठाने पदवी प्रमाणपत्र प्रदान केलेले असतांनाही ते **गहाळ झाले किंवा सापडत नाही,** या सबबी खाली काही विद्यार्थी **पुन्हा नव्याने अर्ज करतात.** अशा विद्यार्थ्यांचेही अर्ज बाद करण्यात येतील. अशा विद्यार्थ्यांनी **दुय्यम पदवी प्रमाणपत्रासाठी** (Duplicate Degree Certificate) स्वतंत्र अर्ज करणे अपेक्षीत आहे. त्यासाठी त्यांनी विद्यापीठ कार्यालयात (0257-2257319) संपर्क साधावा.

५. स्वायत्त महाविद्यालयातून उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी त्यांचे पदवी प्रमाणपत्रासाठीचे अर्ज आपापल्या महाविद्यालयात जमा करावेत. नंतर संबंधित महाविद्यालय ते सर्व अर्ज एकत्रितपणे विद्यापीठास सादर करतील.

६. ३३ व्या दीक्षांत समारंभासाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांचे पदवी प्रमाणपत्र प्रस्तुत समारंभाच्या दिवशी व तदनंतरच मिळू शकेल. **संमारंभापूर्वी पदवी प्रमाणपत्र मिळण्याबाबत विद्यार्थ्यांनी आग्रह धरू नये**. अशा आग्रहाचा कोणताही विचार केला जाणार नाही.

७. माहे नोव्हेंबर, २०२३ पूर्वीच्या विद्यार्थ्यांना **नोकरी / पुढील शिक्षण/ व्यवसाय/ परदेश गमण किंवा अन्य कारणांमुळे तातडीचे प्रमाणपत्र** हवे असल्यास त्यांनी विद्यापीठाच्या Apply for Urgent Degree Certificate या लिंक वरुन अर्ज करावा व त्यासाठी **रु.३९००/-** (पाच वर्षापेक्षा जास्त कालावधी) व **रु.३१००/-** (पाच वर्षापेक्षा कमी कालावधी) असे शुल्क भरावे. अशा विद्यार्थ्यांना साधारणपणे **४५ दिवसानंतर** त्यांचे प्रमाणपत्र मिळू शकेल.

८. तातडीचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्याने जर ३३ व्या समारंभात पदवी मिळण्यासाठी अर्ज केलेला असल्यास तो अर्ज रदद करण्यात येईल व भरलेले शुल्कही परत केले जाणार नाही.

९. विद्यार्थ्यानी अर्ज भरण्यापूर्वी स्वत:चा अलिकडचा रंगीत पासपोर्ट साईज फोटो व प्रचलीत स्वाक्षरी योग्य पध्दतीने (96 ते 150 dpi पर्यंत) JPEG Format मध्ये Scan करुन ठेवावी.

१०. तदनंतर विद्यार्थ्यांस ज्या पदवी/पदविका प्रमाणपत्रासाठी अर्ज करावयाचा आहे, त्या अभ्यासक्रमाचे अंतिम वर्षाचे गुणपत्रक व आधार कार्ड (75KB पेक्षा कमी) PDF Format मध्ये Scan करावे.

११. विद्यार्थ्यांने मुळ गुणपत्रकाचीच PDF सोबत जोडावी. तसेच सदर PDF वाचनीय (Readable) असणे आवश्यक आहे. Net Print असलेले गुणपत्रक ग्राहय धरले जाणार नाही, असे अर्ज बाद करण्यात येतील.

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

## विद्यार्थ्यांनी Online अर्ज भरतांना खालील प्रक्रिया पुर्ण करावी.

१. ऑनलाईन पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज करण्याकामी विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेत स्थळाच्या Home Page वरील Student Corner - Convocation - 33rd Convocation Ceremony या लिंकवरुन आपला Online अर्ज भरण्यास सुरूवात करावी.

२. 33rd Convocation Ceremony या Link वर Click करुन त्यातील Here to Apply Online ही लिंक ओपन करावी.

३. Online अर्ज करण्याकामी विद्यार्थ्यांने प्रथमत: स्वत:चे रजिष्ट्रेशन करावे व तद्‌नंतर मिळालेला User ID व Password टाकून Login ची प्रक्रिया पूर्ण करावी. विद्यार्थ्यांनी त्यांना मिळालेला User ID व Password भविष्यातील आपल्या अर्जाची वाटचाल जाणून घेण्याकामी सांभाळून ठेवावा.

४. Online अर्ज भरतांना विद्यार्थ्यांनी आपला परमनंट रजिष्ट्रेशन नंबर (PRN) अचुक टाकावा. तदनंतरच विद्यार्थ्याची शैक्षणिक माहिती पोर्टलवर उपलब्ध होईल व त्यानंतर विद्यार्थ्यांनी पुढील सुचनेनुसार अर्ज भरण्याची प्रक्रीया पूर्ण करावी.

५. अचुक PRN टाकल्यानंतरही जर आपले Examination Record उपलब्ध न झाल्यास विद्यार्थ्यांनी Please Click Here to Continue to Online Application to Regular Degree Certificate या Link वरुन अंतिम वर्षाच्या गुणपत्रकाप्रमाणे संपूर्ण शैक्षणीक माहिती त्या-त्या रकान्यात अचुकपणे भरावी.

६. विद्यार्थ्यांनी आधार कार्डावरील आपला आधार क्रमांक व स्त्री-पुरुष ही नोंद अचुक करावी.

७. विद्यार्थ्याने Scan केलेला रंगीत पासपोर्ट साईज फोटो व स्वाक्षरी Upload करावी.

८. विद्यार्थ्याने अंतिम वर्षाचे गुणपत्रक (Net Print नव्हे ) व आधार कार्ड Upload करावे.

९. **विद्यार्थ्याने अर्ज सबमिट करण्यापूर्वी Online अर्जात भरलेल्या माहितीची पुन्हा एकदा खात्री करावी, कारण एकदा अर्ज सबमिट केल्यावर त्यात दुरूस्ती करता येणार नाही.**

१०. पदवी/पदविका प्रमाणपत्र अर्जाचे शूल्क Credit Card/Debit Card/ Net Banking/ UPI द्वारे Online पध्दतीने भरण्यात यावें.

११. Online Payment करतांना जर खात्यातून रक्कम कपात झाली व Payment Receipt मात्र Generate झाली नाही, अशा वेळी विद्यार्थ्यांनी किमान २४ तासापर्यंत Bank Reconciliation साठी वाट पाहावी. २४ तासापर्यंत दुसरे Payment करू नये. तद्वतच दुसरे Payment करण्याआधी संबंधित विद्यार्थ्यांनी विद्यापीठातील वित्त विभागाच्या 0257-2257251 या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

१२. एकदा भरलेले शूल्क कोणत्याही सबबीवर परत मिळणार नाही.

१३. विद्यार्थ्यास आपल्या अर्जात काही त्रुटी अथवा अपूर्णता आढळून आल्यास विद्यार्थ्याने अर्ज सादर केल्याच्या ७ दिवसांच्या आत convocation@nmu.ac.in या मेल वर आपली त्रुटी कळवावी व त्या त्रुटीची पूर्तता करुन घ्यावी. तदनंतर त्रुटी असलेल्या विद्यार्थ्यांचा अर्ज नस्तीबध्द केला जाईल.

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

***